क्र.काप्रावि/आयसीडी/२०१५.१६/७८
22-6-15

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

क्र.१/२०१५- २०१६

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा **सोमवार,** ***दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी सकाळी ११.३०*** वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई –४०० ०३२, येथे संपन्न झाली. सभेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते :-

१. डॉ. राजन वेळूकर (कुलगुरू)
२. प्राचार्य (डॉ.) नरेश चंद्र (प्र-कुलगुरू)
३. डॉ. प्रल्हाद जी. जोगदंड
४ प्राचार्य (डॉ.) राजपाल एस. हांडे (संचालक, बी.सी.यु.डी.)
५. प्राचार्य (डॉ.) दत्ताजीराव यशवंतराव पाटील
६. प्राचार्य (डॉ.) गोरक्ष विठ्ठलराव पारगांवकर
७. डॉ. वसंत सिताराम शेकडे
८. डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद
९. श्री. महादेव बाबुराव जगताप
१०. डॉ. विजय भालचंद्र जोशी
११. श्री. संजय बा. शेटे

**श्री. अजय वढावकर**

'नुक्कड' या लोकप्रिय मालिकेत गणपत हवालदाराची भूमिका साकारणारे ज्येष्ठ अभिनेते श्री. अजय वढावकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक २७ फेंब्रुवारी ्१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५९ वर्षांचे होते.

**श्री. श्रीधर गुप्ते**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू श्री. श्रीधर चंद्रशेखर गुप्ते यांचे दिर्घ आजाराने दिनांक ११ मार्च २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

**श्रीमती. कृष्णा कल्ले**

हिंदी आणि मराठी गीतांना सुमधुर आवाजाने अजरामर करणा-या जेष्ठ गायिका श्रीमती. कृष्णा कल्ले यांचे दिर्घ आजाराने दिनांक १५ मार्च २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षांचे होते.

**श्री. शाहीर साबळे**

आपल्या शाहिराने मराठीने माणसांच्या हृदयात अढळ स्थान निर्माण करणारे पद्मश्री शाहीर साबळे यांचे दिर्घ आजाराने दिनांक २१ मार्च २०१५ रोजी निधन झाले.

**श्री. हनुमंत उपरे**

ओबीसी बांधव बुध्दधम्माच्या वाटेवर या चळवळीचे प्रणेते, सत्यशोधक ओबीसी परिषदेचे राज्याध्यक्ष, हनुमंते उपरे (काका) यांचे दिर्घ आजाराने दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी निधन झाले.

**श्री. वसंत भालेकर**

खेळ व सिनेमांचा चालताबोलता इतिहास असणारे महाराष्ट्र टाइम्सचे ज्येष्ठ क्रिडा व सिनेपत्रकार श्री. वसंत भालेकर यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

**श्रीमती अनितामाई धर्माधिकारी**

अध्यात्मिक निरूपणाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचे महत्वाचे कार्य या परिवाराकडून केले जात होते, त्यात माईची भूमिका मोठी होती. श्रीमती अनितामाई धर्माधिकारी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६३ वर्षांच्या होत्या.

त्यानंतर मा. कुलगुरूंनी वृत्तपत्रे, प्रसार माध्यमातून नेपाळ व भारतातील उत्तरेकडील काही भागात ६.९ रिस्टर स्केलचा भूंकप होऊन मोठया प्रमाणात वित्त व जिवित हानी झाल्याबद्दल स्वता: व विद्यापीठातर्फे मृत व्यक्तींना श्रंध्दाजली अर्पण केली.

मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जे या काळात निधन पावले त्यांनाही श्रंध्दाजली वाहण्यात आली.

**अभिनंदन –**

डॉ. मुरलीधर चांदेकर यांची लातुर विद्यापीठात प्र-कुलगुरू पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

ब १: दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ रोजीचे इतिवृत्त तसेच २३ फेब्रुवारी, २०१५ रोजीची स्थगित सभा दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेंचे इतिवृत्त मान्यतेसाठी.

ठराव २३ फेब्रुवारी, २०१५ रोजीची स्थगित सभा दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील सुरवातीला झालेल्या चर्चेदरम्यान डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद, श्री. महादेव बाबुराव जगताप, श्री. संजय बा. शेटे, प्राचार्य (डॉ.) दत्ताजीराव यशवंतराव पाटील आणि डॉ. वसंत सिताराम शेकडे यांनी पेण महाविद्यालयाच्या तक्रारीबाबत खालील ठरावावर डिसेंट नोंदवला.

> पेण महाविद्यालयातील भूगोल विषय तसेच अन्य तक्रारींबाबत नेमलेल्या सत्यशोधक समितीने सादर केलेला अहवाल सखोल चर्चेअंती सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन स्विकारण्यात आला. परंतु विधी सल्लागारांचा सल्ला घेतल्याशिवाय समितीच्या अहवालावर कारवाई करू नये, असा ठराव करण्यात आला.'

बाब क्र.२ ते ६ शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता **नविन महाविद्यालये**/नविन अभ्यासक्रम/अतिरिक्त तुकडयांबाबत अंत्यत महत्त्वाचा विषय असल्याने व सदर प्रस्ताव शासनाकडे दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी पर्यंत पाठवायचे असल्याने प्रस्तावांचा अभ्यास करण्यासाठी सभासदांनी वेळ मिळावा अशी त्यांनी मागणी केल्यामुळे ही सभा स्थगित करून दुस-या दिवशी २८ एप्रिल, २०१५ रोजी घेण्याचे जाहिर करण्यात आले.

मान्यतेसाठी

| कुलगुरु | प्र-कुलगुरु | संचालक, बी.सी.यु.डी. | कुलसचिव | स्थानापन्न उप-कुलसचिव कार्यकारी प्राधिकरणे |
|---|---|---|---|---|